# समास

| | |
|---|---|
| शब्दनिर्मिती | • **'सम + आस'** - या संस्कृत धातूपासून. |
| अर्थ | • 'एकत्र करणे' |
| व्याख्या व स्पष्टीकरण | • दोन किंवा अधिक शब्दांमधील परस्पर संबंध दाखविणारे ______________ यांचा लोप होऊन त्यांचा एक जोडशब्द तयार होतो शब्दांच्या या **एकत्रीकरणाला** समास असे म्हणतात.<br>• समासात किमान दोन पदे एकत्र येतात.<br>• समासात जोडशब्द तयार करताना **विभक्ती प्रत्यय किंवा मधला शब्द** गाळला जातो म्हणुन समास ही भाषेतील ______________ आहे.<br>• समासात मूलभूत घटकांची/पदांची असणारी संख्या- ______________. |
| सामासिक शब्द | • **शब्दांच्या एकत्रिकरणाने** तयार होणाऱ्या जोडशब्दाला सामासिक शब्द म्हणतात. |
| विग्रह | • **कमीत कमी शब्दात** सामासिक शब्दाचे केलेले __________ म्हणजे विग्रह.(आयोग) |
| | **समास व संधी यांच्या व्याख्येतील Confusion**<br>समास- शब्दांचे एकत्रीकरण<br>संधी - वर्णांचे एकत्रीकरण |

## समासाचे प्रकार

· समासात मूलभूत घटकांची संख्या किमान दोन असते, या दोन शब्दांचा किंवा पदांचा एकमेकांशी असलेल्या संबंधावरून समासाचे प्रमुख चार प्रकार पडतात.

| समास | प्रधानपद | गौणपद | शब्दजात |
|---|---|---|---|
| अव्ययीभाव समास | | | |
| तत्पुरुष समास | | | |
| द्वंद्व समास | | | |
| बहुव्रीही समास | | | |

**केवल समास**- वरील कोणत्याच जातीत न बसणारा समास.

## 1) अव्ययीभाव समास

पूर्वपदप्रधान समास/ प्रथमपदप्रधान समास

- ज्या सामासिक शब्दातील प्रथम पद महत्त्वाचे असून ते **बहुतेक वेळा अव्यय** असते व या सामासिक शब्दाचा वापर **क्रियाविशेषणासारखा** केला जातो त्या समासाला अव्ययीभाव समास म्हणतात.
- ज्या समासात पहिला शब्द प्रधान असतो आणि जो सगळा सामासिक शब्द ______________ असतो त्या समासास अव्ययीभाव समास असे म्हणतात.- मो.के दामले
- लक्षात ठेवा- प्रथम पद नेहमीच अव्यय नसते तर ________ ते अव्यय असते.
  (बहुधा/बहुतेक वेळा हा शब्द इथे लक्षात ठेवा.)
- यातील सामासिक शब्द हा ________ **क्रियाविशेषण अव्ययाचे** काम करतो आणि क्रियाविशेषणे ही अव्यये असल्याने या समासाला अव्ययीभाव समास म्हणतात.

### अव्ययीभाव समासाचे प्रकार

### 1) संस्कृत अव्ययीभाव समास

- या समासात पहिले पद ही **संस्कृतमधील** ________ असतात. (संस्कृतमध्ये उपसर्ग म्हणजेच अव्यय)
- उदाहरणार्थ- आ (पासून),आ (पर्यंत), यथा (प्रमाणे), प्रति(प्रत्येक), यावत (पर्यंत)

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| आजन्म | जन्मापासून |
| आजीवन | जीवन असेपर्यंत |
| आमरण | मरणापर्यंत |
| यथाशक्ती | शक्तीप्रमाणे |
| आकर्ण | कानापर्यंत |
| आकंठ | कंठापर्यंत |

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| प्रतिदिन | प्रत्येक दिवशी |
| प्रतिक्षण | प्रत्येक क्षणाला |
| यावच्चंद्रोदिवाकरो | चंद्र, सूर्य असेपर्यंत |
| यथाविधी | विधीप्रमाणे |
| यावज्जीव | जीव असेपर्यंत |
| यथामती | मतीप्रमाणे |

### 2) यावनी अव्ययीभाव समास

- या समासातील **पहिले पद** ________ असते व **दुसरे पद फारसी/अरबी नाम किंवा विशेषण** असते.
- उदाहरणार्थ- दर (प्रत्येक), हर (प्रत्येक), बिन (शिवाय), बे (विरुद्ध), गैर (विरुद्ध)

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| दररोज | प्रत्येक दिवशी |
| दरमजल | प्रत्येक मैलावर |
| हरसाल | प्रत्येक साली |
| हरहमेशा | प्रत्येक वेळेला |
| हरवक्त | प्रत्येक वेळेला |
| बेमालूम | माहितीशिवाय |
| बेशक | शंकेशिवाय |

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| गैरहजर | हजेरीशिवाय |
| गैरशिस्त | शिस्तीशिवाय |
| बेलाशक | शंकेशिवाय |
| बिनशर्त | शर्तीशिवाय |
| बिनधोक | धोक्याशिवाय |
| बरहुकूम | हुकुमानुसार |
| बरखास्त | विसर्जित केल्याप्रमाणे |

### 3) संकीर्ण अव्ययीभाव समास

- या समासात **पहिले पद अरबी/ फारसी उपसर्ग** असते व **दुसरे पद हे** ________ **नाम किंवा विशेषण** असते.

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| दरवर्ष | प्रत्येक वर्षी |
| दरदिवस | प्रत्येक दिवशी |
| हरकाम्या | प्रत्येक काम करणारा |

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| हरदिवस | प्रत्येक दिवशी |
| बिनतोड | तोडीशिवाय |
| बिनकामाचा | कामाशिवाय |

### 4) मराठी अव्ययीभाव समास

- शब्दाची द्विरुक्ती होऊन तयार झालेले शब्द ________ कार्य करतात.
- यामध्ये पहिले पद **अव्यय अथवा उपसर्ग नाहीत** मात्र हे शब्द **क्रियाविशेषणाचे कार्य** करीत असल्याने त्याचा समावेश अव्ययीभाव समासात होतो.

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| घरोघर | प्रत्येक घरी |
| दारोदार | प्रत्येक दारी |
| गावोगाव | प्रत्येक गावी |
| रस्तोरस्ती | प्रत्येक रस्त्यावर |
| पदोपदी | प्रत्येक पदावर |
| पावलोपावली | प्रत्येक पदावर |
| जागोजाग | प्रत्येक जागी |
| रातोरात | रात्र संपण्यापूर्वी |

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| रात्रंदिवस | प्रत्येक रात्र व दिवस |
| दिवसेंदिवस | प्रत्येक दिवशी |
| अपरंपार | अमर्याद |
| हातोहात | प्रत्येक हातातून |
| वृक्षागणिक | प्रत्येक वृक्षाला |
| घरबसल्या | घरात बसून |
| दिवसाढवळ्या | दिवसाच्या प्रकाशात |
| भारंभार | समान वजनाचे |

## 2) तत्पुरुष समास

- ज्या सामासिक शब्दातील ________ **पद** महत्त्वाचे असते व विग्रह करताना अर्थाच्या दृष्टीने गाळलेला **शब्द व विभक्ती** प्रत्ययाचा वापर करावा लागतो त्यास तत्पुरुष समास म्हणतात.

### तत्पुरुष समासाचे प्रकार

| 1. व्याधीकरण तत्पुरुष समास | | | |
|---|---|---|---|
| या समासातील दोन्ही पदे विग्रहाच्या वेळी ________ **विभक्तीत** असतात. | | | |
| व्याधीकरण तत्पुरुष समासाचे प्रकार | | | |
| | | | |

| 2. समानाधिकरण तत्पुरुष समास (कर्मधारय समास) | | |
|---|---|---|
| या समासातील दोन्ही पदे विग्रहाच्या वेळी ______ **विभक्तीत** असतात. | | |
| समानाधिकरण तत्पुरुष समासाचे प्रकार | | |
| **1) विशेषणत्वसुचक** | | **2) उपमासूचक** |
| विशेषण पूर्वपद | द्विगु | उपमान पूर्वपद |
| विशेषण उत्तरपद | मध्यमपदलोपी | उपमान उत्तरपद |
| विशेषण उभयपद | | उपमान उभयपद |

## विभक्ती तत्पुरुष समास

| | सा. शब्द | विग्रह | | सा. शब्द | विग्रह |
|---|---|---|---|---|---|
| द्वितीया | कृष्णाश्रीत | | | देशगत | |
| | दुःखप्राप्त | | | देवाश्रित | |
| तृतीया | तोंडपाठ | तोंडाने पाठ | | गुणहीण | गुणांने हीन |
| | दयार्द्र | दयेने आर्द्र | | ईश्वरनिर्मित | ईश्वराने निर्मित |
| | कष्टसाध्य | कष्टाने साध्य | | उपासमार | उपासाने मार |
| | बुद्धीजड | बुद्धीने जड | | भक्तीवश | भक्तीनेवश |
| चतुर्थी | गायरान | गायीसाठी रान | | कृष्णार्पण | कृष्णाला अर्पण |
| | कमरपट्टा | कमरेसाठी पट्टा | | व्याहीभोजन | व्याह्यासाठी भोजन |
| | विद्यालय | विद्येसाठी आलय | | बाईलवेडा | बाईसाठी वेडा |
| | मेंढवाडा | मेंढीसाठी वाडा | | वाटखर्च | वाटेसाठी खर्च |
| | पुजाद्रव्य | पुजेसाठी द्रव्य | | सचिवालय | सचिवासाठी आलय |
| | मंत्रालय | मंत्र्यासाठी आलय | | पोळपाट | पोळीसाठी पाट |
| पंचमी | गर्भश्रीमंत | गर्भापासून श्रीमंत | | रोगमुक्त | रोगापासून मुक्त |
| | सेनानिवृत्त | सेनेतून निवृत्त | | धर्मभ्रष्ट | धर्मातून भ्रष्ट |
| | जातीभ्रष्ट | जातीतून भ्रष्ट | | वडिलोपार्जित | वडिलांपासून उपार्जित |
| | पदच्युत | पदापासून मुक्त | | कर्जमुक्त | कर्जातून मुक्त |
| षष्ठी | देवपूजा | देवाची पूजा | | विद्याभ्यास | विद्येचा अभ्यास |
| | राजवाडा | राजाचा वाडा | | धर्मबुद्धी | धर्माची बुद्धी |
| | घोडदौड | घोड्याची दौड | | भोजनअवसर | भोजनाचे अवसर |
| | लक्ष्मीकांत | लक्ष्मीचा कांत | | गणपती | गणांचा पती |
| | ज्ञानयज्ञ | ज्ञानाचा यज्ञ | | देशभक्ती | देशाची भक्ती |
| | धर्मवेड | धर्माचे वेड | | पिंपळपान | पिंपळाचे पान |
| | आमराई | आंब्याची राई | | पायरव | पायाचा रव |
| | भूपती | भूचा पती | | कालवैभव | कालाचे वैभव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सप्तमी | स्वर्गवास | स्वर्गातील वास | | पानकोंबडा | पाण्यातील कोंबडा |
| | पोटशुळ | पोटातील शुळ | | विद्यापरांगत | विद्येतील परांगत |
| | वनभोजन | वनातील भोजन | | कलाचातुर्य | कलेतील चातुर्य |
| | घरधंदा | घरातील धंदा | | कलाकुशल | कलेतील कुशल |
| | कुपमंडूक | कुपातील मंडूक | | | |
| मिक्सिंग | गावदेवी | गावाची देवी | | | |
| | | गावातील देवी | | | |
| | ज्ञानयज्ञ | ज्ञानाचा यज्ञ | | | |
| | | ज्ञानासाठी यज्ञ | | | |
| | जन्मखोड | जन्मापासून खोड | | | |
| | | जन्माची खोड | | | |
| | चोरभय | चोरापासून भय | | | |
| | | चोराचे भय | | | |

**अलुक तत्पुरुष समास**

अलुक - लोप न होणे / लुक - लोप होणे

- या समासात पहिल्या पदातील **विभक्तीची रूपे लोप न पावता** तशीच राहतात.
- या विभक्ती तत्पुरुष समासात पूर्व पदाच्या विभक्ती प्रत्ययाचा लोप होत नाही म्हणून याला **अलुक तत्पुरुष** समास असे म्हणतात. ( या समासामध्ये **सप्तमी विभक्तीचे प्रत्यय** असणारे शब्द जास्त प्रमाणात दिसून येतात. )

| सामासिक शब्द | लोप न होणारी विभक्तीची रूपे |
|---|---|
| अग्रेसर | अग्रे |
| युधिष्ठिर | युधि |
| पंकेरुह | पंके |
| सरसिज | सरसि |
| कर्तरीप्रयोग | कर्तरी |
| कर्मणीप्रयोग | कर्मणी |

| सामासिक शब्द | लोप न होणारी विभक्तीची रूपे |
|---|---|
| दिनानाथ | दिना |
| खिसेकापू | खिसे |
| कथेकरी | कथे |
| पहारेकरी | पहारे |
| तोंडीलावणे | तोंडी |
| पाठीघालणे | पाठी |

**उपपद तत्पुरुष समास**

- या समासामध्ये **दुसरे पद** __________ असून ती **धातुसाधिते किंवा कृदंते** असतात.
- या धातुसाधितांचा वाक्यात स्वतंत्रपणे वापर करता येत _____.
- या धातुसाधितांमधील धातू हा या समासाच्या विग्रहामध्ये ________________ असतो.

| | |
|---|---|
| द्विज | दोनदा जन्मणारा |
| मनुज | मनुपासून जन्मणारा |
| पूर्वज | पूर्वी जन्मलेले |
| अंडज | अंड्यातून जन्मणारे |
| वंशज | वंशात जन्मलेले |
| अग्रज | आधी जन्मलेले |
| सरसिज | सरोवरात जन्मणारे |
| पंकज | चिखलात जन्मणारे |

| | |
|---|---|
| सुज्ञ | उत्तम जाणणारा |
| कृतज्ञ | केलेले जाणणारा |
| तत्वज्ञ | तत्त्व जाणणारा |
| तंत्रज्ञ | तंत्र जाणणारा |
| शास्त्रज्ञ | शास्त्र जाणणारा |

| | |
|---|---|
| मार्गस्थ | रस्त्यात असणारा |
| देशस्थ | देशी भागात राहणारा |
| पांथस्थ | रस्त्यात असलेला |
| गृहस्थ | घरात राहणारा |

| | |
|---|---|
| नृप | नराचे किंवा प्रजेचे रक्षण करणारा |
| गोप | गाईचे पालन करणारा |
| भूप | भूमीचे पालन करणारा |

| | |
|---|---|
| कृतघ्न | केलेले न जाणारा |

| | |
|---|---|
| कुंभकार | कुंभ करणारा |
| ग्रंथकार | ग्रंथ करणारा |
| शेतकरी | शेती करणारा |
| लेखक | लेखन करणारा |
| शिल्पकार | शिल्प करणारा |
| कथेकरी | कथा करणारा |
| पहारेकरी | पहारा करणारा |

| | |
|---|---|
| सुखद | सुख देणारे |
| जलद | पाणी देणारे (ढग ) |

| | |
|---|---|
| शेषशायी | शेषावर शयन करणारा |

| मराठी शब्दाची उदा - | कामकरी,शेतकरी, आगलाव्या, पाखरेविक्या, किसेकापू, वाटसरू, भाजीविक्या, लाकूडतोड्या |
|---|---|

## उभय- तत्पुरुष समास

- या समासात पहिल्या पदातील विभक्तीचा लोप होत नाही व दुसऱ्या पदातील रूपे धातूसाधिते असतात.
- उदा- **मळेकरी, पहारेकरी, पाखरेविक्या खिसेकापू, गळेकापू, भाजीविक्या, सरसिज, पंकेरूह.**

हे उभय- तत्पुरुष समास नाही - ________________.

## नञ तत्पुरुष समास

- या तत्पुरुष समासातील **दुसरे पद महत्त्वाचे** असून **पहिले पद** ____________ असते.
- **अ, अन, बे, नि, गर** ही नकारार्थाची पहिली पदे ____________ दर्शवणारी असतात.

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| अनादर | आदर नसलेला |
| नापसंत | पसंत नसलेले |
| नाकर्ता | करता नसलेला |
| अधर्म | धर्म नव्हे ते |
| अज्ञान | ज्ञान नव्हे ते |
| अयोग्य | योग्य नसलेले |

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| अन्याय | न्याय नव्हे ते |
| नाउमेद | उमेद नसलेले |
| निरोगी | रोगी नसलेला |
| बेडर | डर नसलेला |
| नाईलाज | इलाज नसलेला |
| गैरहजर | हजर नसलेला |

## समानाधिकरण तत्पुरुष समास - (कर्मधारय समास)

- ज्या तत्पुरुष समासामध्ये विग्रह करताना दोन्ही पदे **एकाच विभक्तीत (प्रथमा विभक्ती)** असतात त्या समासाला **कर्मधारय समास** म्हणतात.
- या समासात एक पद विशेषण व एक पद हे नाम असते.( कधी कधी दोन्ही पदे विशेषणे असतात )
- या समासात दोन पदांचा संबंध विशेषण- विशेष्य, उपमान- उपमेय असा असतो आणि त्यावरून या समासाचे दोन प्रकार पडतात.

विशेषणत्वसूचक व उपमासूचक

### विशेषणत्वसुचक

- यामध्ये दोन पदांचा संबंध ____________________ असा असतो.

#### 1. विशेषण - पूर्वपद

- या समासात **पहिले /पूर्व पद** ____________ असते.
- विग्रह करताना 'असे' हा शब्द वापरला जातो.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| महादेव | महान असा देव |
| पितांबर | पिवळे असे अंबर |
| नीलकमल | निळे असे कमल |
| रक्तचंदन | रक्त असे चंदन |
| साडेतीन | अर्ध्यासह तीन |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| तांबडीमाती | तांबडी अशी माती |
| सुविचार | चांगले असे विचार |
| महाराष्ट्र | महान असे राष्ट्र |
| भोळासांभ | भोळा असा सांभ |
| काळमांजर | काळे असे मांजर |

#### 2. विशेषण उत्तरपद

- या समासात **दुसरे पद विशेषण** असते.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| घननील | निळा असा घन |
| पुरुषोत्तम | उत्तम असा पुरुष |
| भाषांतर | अन्य अशी भाषा |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| वेशांतर | अन्य असा वेश |
| देशांतर | अन्य असा देश |
| रामदयाल | दयाळू आसा राम |

#### 3. विशेषण उभयपद

- या समासात **दोन्ही पदे विशेषणे** असतात.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| श्यामसुंदर | |
| पांढराशुभ्र | |
| लालभडक | |
| हिरवेगार | |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| काळभोर | |
| कृष्णधवल | |
| पिवळाधमक | |
| निळाशार | |

## 4. द्विगु समास

- या समासात **पहिले पद** ______________________ असते. (हा समास नेहमी ______________________ असतो.)
- या कर्मधारय समासामध्ये पहिले पद हे संख्याविशेषण असते व हा समासिक शब्द **समुच्चयदर्शक अर्थ** प्रकट करतो.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| पंचवटी | पाच वडांचा समूह |
| त्रिभुवन | तीन भुवनांचा समूह |
| नवरात्र | नऊ रात्रीचा समूह |
| चातुर्मास | चार मासांचा समूह |
| सप्ताह | सात दिवसांचा समूह |
| पंचपाळे | पाच पाळांचा समुह |
| बारभाई | बारा भाईचा समूह |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| पंचारती | पाच आरत्यांचा समूह |
| पंचामृत | पाच अमृतांचा समूह |
| त्रिदल | तीन दलांचा समूह |
| त्रिशूल | तीन शूलांचा समूह |
| त्रिदेव | तीन देवांचा समूह |
| त्रिलोक | तीन लोकांचा समूह |
| षण्मास | सहा मासांचा समूह |

**इथे फसु शकतो** - 'तीनचार' - या सामासिक शब्दात पूर्वपद संख्याविशेषण आहे परंतु हा द्विगु समास नाही कारण याचा विग्रह तीन किंवा चार असा होऊन हा द्वंद्व समास होतो.

## 5. मध्यमपदलोपी समास

- ज्या कर्मधारय समासामध्ये पहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशी संबंध दाखविणारी **मधली पदे लोप** करावी लागतात त्या समासाला **मध्यमपदलोपी समास** असे म्हणतात.
- या समासाला ______________________ **कर्मधारय समास** असेही म्हटले जाते कारण यामध्ये **'युक्त, द्वारा, पुरता, असलेला, या नात्याने, तयार केलेला'** यासारखे गाळली गेलेली पदे विग्रह करताना वापरली जातात.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| पुरणपोळी | पुरण घालून तयार केलेली पोळी |
| कांदेपोहे | कांदे घालून तयार केलेले पोहे |
| चुलतसासरा | नवऱ्याचा चुलता या नात्याने सासरा |
| साखरभात | साखर घालून तयार केलेला भात |
| मावसभाव | मावशीचा मुलगा या नात्याने भाऊ |
| डाळवांगे | वांगेयुक्त डाळ किंवा डाळयुक्त वांगे, |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| लंगोटी मित्र | लंगोटी घालित असल्यापासुनचा मित्र |
| घोडेस्वार | घोडे असलेला स्वार |
| गुळांबा | गूळ घालून तयार केलेला आंबा |
| भोजनभाऊ | भोजनापुरता भाऊ |
| बटाटेभात | बटाटेयुक्त भात |
| नातसुन | नातवाची बायको या नात्याने सून |
| बालमित्र | बालपणापासूनचा मित्र |

**उपमासूचक**

- यामध्ये दोन्ही पदातील संबंध ______________________ या स्वरूपाचा असतो.
- विग्रह करताना वापरले जाणारे शब्द- 'सारखे,सारखा'

**1.उपमान – पुर्वपद**

- यामध्ये **पहिले /पूर्वपद उपमान** असते.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| मेघशाम | मेघासारखा श्याम |
| चंद्रमुखी | चंद्रासारखे मुख |
| साखरलिंबू | साखरेसारखे लिंबू |
| कमलनयन | कमळासारखे डोळे |
| रक्तचंदन | रक्तासारखे चंदन |

**2.उपमान- उत्तर पद**

- यामध्ये **दुसरे/ उत्तर पद उपमान** असते.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| मुखकमल | कमलासारखे मुख |
| मुखचंद्र | चंद्रासारखे मुख |
| चरणकमल | कमलासारखे चरण |
| पुरुषसिंह | सिंहासारखा पुरुष |
| नरसिंह | सिंहासारखा नर |

**3.रूपक उभयपद**

- **दोन्ही पदे** ______________ असतात.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| काव्यामृत | काव्य हेच अमृत |
| भवसागर | भव हाच सागर |
| विद्युतलता | विद्युत हीच लता |
| चरणकमल | चरण हेच कमल |
| भारतमाता | भारत हीच माता |
| विद्यादन | विद्या हेच धन |

**Mixing**

| | | |
|---|---|---|
| चरणकमल | कमलासारखे चरण | |
| | चरण हेच कमल | |
| मुखकमल | कमलासारखे मुख | |
| | मुख हेच कमल | |

**तुमच्या नोटस्—**

## 3) द्वंद्व समास

**उभयपद प्रधान समास**

- ज्या समासातील **दोन्ही पदे अर्थाच्या दृष्टीने समान दर्जाची म्हणजेच** ______ असतात त्या समासाला द्वंद्व समास म्हणतात.
- या समासाचा विग्रह करताना **आणि, वा, किंवा** ही उभयान्वयी अव्यय वापरली जातात.

### इतरेतर द्वंद्व समास

- **'आणि, व'** या ______ उभयान्वयी अव्ययाचा उपयोग.(**इतर, इत्यादी नव्हे**)
- हा समास नेहमी ______ असतो.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| आईबाप | आई आणि बाप |
| हरिहर | हरी आणि हर |
| कृष्णार्जुन | कृष्ण आणि अर्जुन |
| मायलेकी | आई आणि लेक |
| ब्रह्माविष्णूमहेश | ब्रह्मा,विष्णू आणि महेश |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| स्त्रीपुरुष | स्त्री आणि पुरुष |
| एकवीस | एक आणि वीस |
| बहिणभाऊ | बहीण आणि भाऊ |
| विटीदांडू | विटी आणि दांडू |
| कुलूपकिल्ली | कुलूप आणि किल्ले |

### वैकल्पिक द्वंद्व

- विग्रह करताना **'किंवा, अथवा, वा'** हे ______ उभयान्वयी अव्ययाचा वापर केला जातो
- दोन्ही पदे ______ **अर्थाची** असतात.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| खरेखोटे | खरे किंवा खोटे |
| तीनचार | तीन किंवा चार |
| बरेवाईट | बरे किंवा वाईट |
| पासनापास | पास किंवा नापास |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| पापपुण्य | पाप किंवा पुण्य |
| धर्माधर्म | धर्म किंवा अधर्म |
| न्यायन्याय | न्याय किंवा अन्याय |
| सत्यासत्य | सत्य किंवा असत्य |

### समाहार द्वंद्व

- समाहार म्हणजे अनेक गोष्टी एकत्रित करणे.

- विग्रह करताना सामासिक शब्दातील पदांच्या अर्थव्यतिरिक्त त्याच जातीतील ______ समावेश केलेला असतो.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| मीठभाकर | मीठ भाकरी व इतर साधे खाद्यपदार्थ |
| चहापाणी | चहापाणी व फराळाचे इतर पदार्थ |
| अंथरूणपांघरून | अंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व इतर कपडे. |
| घरदार | घर व घरातील इतर वस्तू |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| बाजारहाट | बाजार, हाट व इतर वस्तू |
| पालापाचोळा | पाला,पाचोळा व इतर वस्तू |
| हळदीकुंकू | हळदी, कुंकू इतर वस्तू |
| कपडालत्ता | कपडे, लत्ता व इतर कपडे |

हे शब्द समाहार द्वंद्व समास नाहीत- **कागदबिगद, शेजारीपाजारी, ओळखपाळख**
ओळखायचं कसे- यातील **दुसरे पद/उत्तरपद ______ असते** .

| | |
|---|---|
| इतरेतर द्वंद्व | |
| समाहार द्वंद्व | |

## 4) बहुव्रीही समास

बहु- पुष्कळ / व्रीही - धान्य ( तांदूळ)

| | |
|---|---|
| अर्थ | आहेत पुष्कळ धान्य (तांदूळ) असा तो- शेतकरी (धान्य संपन्न व्यक्ती) |
| व्याख्या | ज्या समासातील **दोन्ही पदे महत्वाची** ________ त्या दोन पदांव्यतिरिक्त **तिसऱ्याच पदाचा बोध** होतो त्या समासाला बहुव्रीही समास असे म्हणतात. |
| स्पष्टीकरण | • हा सामासिक शब्द तिसऱ्या पदाचा बोध होणाऱ्या पदाचे ________ असते.<br>• सामासिक शब्दाचा विग्रह करताना ________ **सर्वनामाचा** उपयोग केला जातो. |

| | | |
|---|---|---|
| **नीलकंठ** | नीलकंठ- निळा असा कंठ | |
| | पार्वतीने निळकंठास वरले.<br>नीलकंठ - निळा आहे कंठ ज्याचे असा तो- भगवान शंकर | |
| **पितांबर** | पितांबर - पिवळे असे अंबर | |
| | समुद्राने पितांबरला आपली कन्या दिली.<br>पितांबर- पिवळे आहे अंबर ज्याचे असा तो - भगवान विष्णू | |
| **दशमुख** | दशमुख - दहा मुखांचा समूह | |
| | रामाने दशमुखास ठार केले.<br>दशमुख- दहा आहेत मुखे ज्याला असा तो- रावण | |

**लक्षात ठेवा** - आयोगाने एखादे वाक्य विचारून आधोरेखित शब्दाचा समास ओळखा असे विचारले तर अशावेळी उत्तर बहुव्रीही समास असते, म्हणजेच **विग्रहावरून समास कोणता ते ठरवावे.**

### बहुव्रीही समासाचे प्रकार

#### 1) विभक्ती बहुव्रीही समास

- बहुव्रीही समासाचा विग्रह करताना ________ **सर्वनामाचा** उपयोग करावा लागतो ते **संबंधी सर्वनाम ज्या विभक्तीत** असते त्या विभक्तीचे नाव या समासाला दिले जाते.

| **प्रकार** | उदाहरणे | |
|---|---|---|
| **द्वितीया** | प्राप्तधन - प्राप्त आहे धन ज्यास असा तो<br>प्राप्तोदक - प्राप्त आहे उदक ज्यास असा तो | लब्ददृष्टी- लब्द आहे दृष्टी ज्यास असा तो |
| **तृतीया** | जितेंद्रिय -जिंकले आहेत इंद्रिय ज्याने असा तो<br>कृतकार्य - केले आहे कार्य ज्याने असा तो | कृतकृत्य - केले आहे कृत्य ज्याने असा तो<br>दत्तधन - दिले आहे धन ज्याने असा तो |
| **चतुर्थी** | चौकोन - चार आहेत कोण ज्याला असा तो<br>दशमुख - दहा आहेत मुख ज्याला असा तो<br>गजानन - गजाचे आहे आनन ज्याला असा तो | दुतोंडा - दोन आहेत तोंडे ज्याला असा तो<br>चतुर्भुजा - चार आहेत भुजा ज्याला असा तो<br>त्र्यंबक - तीन आहेत अंबक ज्याला असा तो |
| **पंचमी** | निर्धन - गेले आहे धन ज्याच्यापासून असा तो<br>निर्बल - गेले आहे बल ज्याच्यापासून असा तो<br>हतबल - गेले आहेत बल ज्यातून तो | गलितपर्ण - गळाले आहेत पर्ण ज्याच्यापासून असा तो<br>गतवैभव - गेले आहे वैभव ज्याच्यापासून असा तो |

| | | |
|---|---|---|
| षष्ठी | चक्रपाणी- चक्र आहे पाणीत (हातात) ज्याच्या आसा तो<br>लंबोदर- लंब आहे उदर ज्याचे असा तो | मूषकवहन - मुषक आहे वाहन ज्याचे असा तो<br>गरुडध्वज - गरुड आहे ध्वजावर ज्याच्या असा तो<br>चंद्रशेखर - चंद्र आहे शेखर ज्याचे असा तो |
| सप्तमी | कृपादी - कृपा आहे आदी ज्यात असा तो<br>नाक - नाही अक (दुःख) ज्यात असा तो (स्वर्ग) | पूर्णजल - पूर्ण आहे जल ज्यात असे ते<br>भीमादी - भीम आहे आदी ज्यात असे ते (पांडव) |

| **विभक्ती बहुव्रीचे दोन प्रकार** | |
|---|---|
| **समानाधिकरण** | • विग्रह करताना **दोन्ही पदे** ________ विभक्तीत असतात.<br>• सा. शब्दातील **पहिले पद** ________ **विशेषण व दुसरे पद विशेष्य ( नाम )** असते<br>• उदा- प्राप्तोदक - प्राप्त आहे उदक ज्यास असा तो<br>भक्तप्रिय - भक्त आहे प्रिय ज्याला असा तो |
| **व्याधीकरण** | • विग्रह करताना दोन्ही पदे ________ **विभक्तीत** असतात.<br>• सा. शब्दातील **दोन्ही पदे** ________ असतात.<br>• उदा - चक्रपाणि - चक्र आहे पाणीत ज्याच्या तो<br>गजानन - गजाचे आहे आनन ज्याला असा तो<br>पद्मनाभ - पद्म आहे नाभीत ज्याचा असा तो |

## 2.) नत्रबहुव्रीही समास

- बहुव्रीही समासामध्ये जर सामासिक शब्दाचे **पहिले पद नकारदर्शक** असेल तर त्या समासाला नत्रबहुव्रीही समास म्हणतात. (यामध्ये **स्वरापूर्वी** ________ लागून आणि **व्यंजनापूर्वी** ________ **लागून** सा.शब्द बनतो.)

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| अव्यय | नाही व्यय ज्यात असे ते |
| अनंत | नाही अनंत ज्यात असे ते |
| नीरस | नाही रस ज्यात असे ते |
| अक्षय | नाही क्षय ज्यात असे ते |
| निरोगी | नाही रोग ज्याला असे ते |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| अनेक | नाही एक ज्यात असे ते |
| निर्धन | नाही धन ज्याच्यापाशी असा तो |
| अनादि | नाही आदी ज्याला असा तो |
| निशब्द | नाही शब्द ज्यात असे ते |
| निर्बुद्ध | नाही बुद्धी ज्याच्याजवळ असा तो |

| **काही सामासिक शब्दाचा विग्रह नत्र तत्पुरुष व नत्र बहुव्रीही या दोन्ही पद्धतीने होतो.** | **सा. शब्द** | **नत्र तत्पुरुष समास** | **नत्र बहुव्रीही समास** |
|---|---|---|---|
| | असत्य | | |
| | निरोगी | | |
| | निर्धन | | |
| लक्ष्यात ठेवा - | सामासिक शब्दाच्या **अर्थास अनुसरून** विग्रह करावा व समास ठरवावा. | | |

### 3) सहबहुव्रीही समास

- या बहुव्रीही समासामध्ये पहिले पद हे **हे अव्यय** किंवा **'सह' या अव्ययाचे संक्षिप्त रूप '** ' येते.
- हा सामासिक शब्द क्रियाविशेषण म्हणून वापरल्यास अव्ययीभाव तर विशेषण म्हणून वापरल्यास मात्र **सहबहुव्रीही समास** होतो.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| सप्रेम | प्रमाणे सहित आहे असा तो |
| सहपरिवार | परिवाराने सहित आहे असा तो |
| सफल | फलाने सहित आहे असा तो |
| सचैल | चैलाने सहित आहे असा तो |
| सबल | बलाने सहित आहे असा तो |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| सानंद | आनंदाने सहित आहे असा तो |
| सहर्ष | हर्षाने सहित आहे असा तो |
| सव्याज | व्याजाने सहित आहे असा तो |
| सवर्ण | वर्णाने सहित आहे असा तो |
| सतेज | तेजाने सहित आहे असा तो |

### 4) प्रादिबहुव्रीही समास

- या समासात पहिले पद ________________ या **उपसर्गांनी** होते.
- प्रादि चा अर्थ- प्र आदी ( इतर ) उपसर्ग असलेले.

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| सुलक्षणा | चांगले आहेत लक्षणे जिचे अशी ती |
| प्राज्ञ | मिळाले आहे ज्ञान ज्याला असा तो |
| विधवा | मरण पावला आहे जिचा नवरा अशी ती |
| विरागी | विगत आहे राग जिचा अशी ती |

| सा. शब्द | विग्रह |
|---|---|
| दुर्बल | गेले आहे बल ज्याच्यापासून असे ते |
| विख्यात | विशेष आहे ख्याती ज्याची असे ते |
| सुलोचना | चांगले आहेत लोचन जिचे अशी ती |
| प्रबल | अधिक आहे बल ज्याचे असा तो |

### समासाविषयी महत्वाचे

- संस्कृतमधून आलेल्या सामासिक शब्दांचा **( तत्सम शब्दांचा ) संधी** करावा. विध्यार्थी - विद्या + अर्थी
- सामासिक शब्द जर वेगेगळ्या भाषेतील शब्दांपासून बनलेला असेल तर **समास टाळला** जातो. उदा
- हेडगुरुजी.सामासिक शब्दाचे लिंग हे **शेवटच्या शब्दाच्या लिंगाप्रमाणे** असते. उदा- साखरभात,भाजीपाला,गायरान
- एकाच सामासिक शब्दाचे विग्रह वेगवेगळ्या प्रकारे करता येतात.(आयोग)

# आयोगाने विचारलेले महत्वाचे प्रश्न

**1. अनादी' या शब्दाचा समास ओळखा. (Combine-C-Mains Feb. 2023)**

1) अव्ययीभाव समास
2) तत्पुरुष समास
3) द्वंद्व समास
4) बहुव्रीही समास

.........................................................................................................................

**2. खालील सामासिक शब्द व समास यांच्या योग्य जोड्या लावा.**

(a) प्रेमवश — i) षष्ठी तत्पुरुष
(b) देवपूजा — ii) सप्तमी तत्पुरुष
(c) वनभोजन — iii) चतुर्थी तत्पुरुष
(d) क्रीडांगण — iv) तृतीया तत्पुरुष

**पर्यायी उत्तरे : (R. M. Jan. 2023)**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | i | ii |
| 2) | iii | iv | ii | i |
| 3) | iv | iii | ii | i |
| 4) | iv | I | ii | iii |

.........................................................................................................................

**3. रामाने दशमुखास ठार मारले' यातील अधोरेखित शब्दाचा समास ओळखा(R. M. Jan. 2023)**

(अ) तत्पुरुष समास
(ब) द्वंद्व समास
(क) बहुव्रीही समास
(ड) अव्ययीभाव समास

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) आणि (क) बरोबर
2) फक्त (क) बरोबर
3) फक्त (ब) बरोबर
4) फक्त (अ) आणि (ड) बरोबर

.........................................................................................................................

**4. हतबल' या शब्दाचे विभक्ती प्रत्ययाच्या साहाय्याने होणारे पंचमी बहुव्रीही समासाचे रूप कोणते ? (MTS - April 2022)**

(1) हतबल झालेला आहे तो
(2) हातातून बल गेलेला
(3) हातात आहे बल ज्याच्या तो
(4) गेले आहे बल ज्यातून तो

.........................................................................................................................

**5. 'देशगत' हे कोणत्या समासाचे उदाहरण आहे ? (PSI मुख्य 2013)**

1) तृतीया तत्पुरुष
2) षष्ठी तत्पुरुष
3) द्वितीया तत्पुरुष
4) सप्तमी तत्पुरुष

**6.'पार्वतीने नीलकंठास वरले' यातील समास ओळखा. (राज्यसेवा मुख्य 2019)**

(अ) बहुव्रीही समास (ब) द्वंद्व समास
(क) तत्पुरूष समास (ड) अव्ययीभाव समास

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) आणि (ब) दोन्ही बरोबर 2) फक्त (अ) बरोबर
3) फक्त (क) आणि (ड) बरोबर 4) फक्त (ड) बरोबर

......................................................................................................

**7. भोजनावसर' हा कोणत्या प्रकारचा समास आहे ? (Combine-B Aug. 2018)**

1) बहुव्रीही 2) मध्यमपदलोपी
3) तत्पुरुष 4) अव्ययीभाव

......................................................................................................

**8. स्वर्गवास, पोटशूळ, पाणकोंबडा, घरधंदा, कलाकुशल या सामासिक शब्दांचा समास कोणता ?(PSI-2017)**

1) अलुक् तत्पुरुष 2) उपपद तत्पुरुष
3) सप्तमी तत्पुरुष 4) चतुर्थी तत्पुरुष

......................................................................................................

**9. खाली दिलेल्या चार वाक्यातून व्याकरणिकदृष्ट्या अयोग्य असलेल्या वाक्याचा पर्याय लिहा.**

1) द्वंद्व व तत्पुरुष समास असलेले शब्द नामे किंवा विशेषणे असतात.
2) अव्ययीभाव समास असलेला शब्द क्रियाविशेषण असतो.
3) बहुव्रीही असलेला शब्द विशेषण असतो.
4) एकाच सामासिक शब्दाचे विग्रह वेगवेगळ्या प्रकारे करता येत नाही.

......................................................................................................

**10. 'तत्पुरुष समास' हा पुढील काही कारणांनी ओळखला जातो.(STI मुख्य 2014)**

अ. पहिले पद महत्त्वाचे असते.
ब. या समासात पूर्वपदाच्या विभक्ती प्रत्ययाचा लोप होत नाही त्या समासास अलुक तत्पुरुष समास म्हणतात.
क. या समासातील पहिले पद नकारार्थी असते तेव्हा त्यास द्विगू समास म्हणतात.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त अ बरोबर 2) फक्त अ, क बरोबर
3) फक्त ब बरोबर 4) फक्त ब, क बरोबर

......................................................................................................

**11. ग्रंथकार, गृहस्थ, द्विज या शब्दांचा समास कोणता ?(संयुक्त गट 'ब' मुख्य 2019)**

**(1) उपपदतत्पुरुष** (2) षष्ठी तत्पुरुष
(3) चतुर्थी तत्पुरुष (4) व्याधिकरण तत्पुरुष

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | 4 | 2) | 4 | 3) | 2 | 4) | 4 | 5) | 3 |
| 6) | 2 | 7) | 3 | 8) | 3 | 9) | 4 | 10) | 3 |